# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART – TWO


**गुरुवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८**

## अधिसूचना

क्रमांक : १२४/२०१८ — दिनांक : २२.११.२०१८

**विषय :- नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालये सुरु करण्यास शासन आदेशात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल विद्वत परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत स्विकृत केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

**तक्ता**

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | महाविद्यालयाचे नांव व सांकेतिक क्रमांक | विद्याशाखा / अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | संलग्निकरणाचा कालावधी | शासन निर्णय क्र., व दि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | श्री अरुणोदय बहुउद्देशिय शिक्षण संस्था, जळका हिरापुर ता.भातकुली जि.अमरावती | मधुबन महाविद्यालय, (कला व वाणिज्य) सावलीखेडा,ता.धारणी जि. अमरावती (८५०) | बी.ए.भाग-१ (इंग्रजी, मराठी, हिंदी, समाजशास्त्र,राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, सहकार, भूगोल,हिंदी वाङःमय, मराठी वाङःमय,इंग्रजी वाङःमय, गृहअर्थशास्त्र, ग्रामिण हस्तकला, संगीत, योगशास्त्र)<br><br>बी.कॉम.भाग-१ (इंग्रजी,मराठी,हींदी, बीझनेस एकॉनॉमिक्स मॅनेजमेंट, फायनान्शीयल अकाऊंटिंग, प्रिंसीपल ऑफ बीझनेस मॅनेजमेंट, कॉम्पुटर फंडामेंटल ॲन्ड ऑपरेटींग सिस्टीम) | १२०<br><br>१२० | सत्र २०१८-१९ | क्र.एनजीसी-२०१८/(१००/१८)/मशि-४, दि.१५ जून, २०१८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | साद शिक्षण संस्था, द्वारा , सु.ग.राऊत, विजय कॉलनी, कठोरा नाका, अमरावती. | दि. कॉलेज ऑफ ॲनिमेशन बायोइंजिनिअरिंग ॲन्ड रिसर्च सेन्टर, मार्डी रोड, अमरावती (८५१) | बी.एस्सी.भाग-१ (ॲनिमेशन) (अभ्यासक्रमिकेप्रमाणे) | १२० | सत्र २०१८-१९ | क्र. एनजीसी-२०१८/ (१००/१८)/मशि-४, दि.१५ जून, २०१८ |
| ३. | अमृत सेवाभावी संस्था, ता.जि.परभणी | कै.कमलाबाई बनमेरू कला,वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, लोणार जि.बुलडाणा (३९८) | बी.ए.भाग-१ (मराठी,इंग्रजी,हिंदी,उर्दु, राज्यशास्त्र,इतिहास,अर्थशास्त्र, समाजशास्त्र,संगीत, मराठी वाडःमय,इंग्रजी वाडःमय)<br><br>बी.कॉम.भाग-१ (इंग्रजी,मराठी,हींदी, उर्दु, फायनान्शीयल अकाऊंटिंग, बीझनेस ऑर्गनायझेशन ॲन्ड मॅनेजमेंट,एकॉनॉनमिक्स, मॅथेमॅटीक्स ॲन्ड स्टॅटेस्टीक्स, कॉम्पुटर फंडामेंटल ॲन्ड ऑपरेटींग सिस्टीम,कॉर्पोरेट अकाऊंटिंग, )<br>बी.एस्सी.भाग-१ (इंग्रजी,मराठी, हींदी, उर्दु, रसायनशास्त्र,भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र,प्राणिशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स,कॉम्पुटर सायन्स, मायक्रोबायलॉजी, गणित, जिवरसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, पर्यावरणशास्त्र) | १२०<br><br>१२०<br><br>१२० | सत्र २०१८-१९ | क्र.एनजीसी-२०१८/ (१००/१८)/मशि-४, दि.१५ जून, २०१८ |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****